| | | | |
|---|---|---|---|
| MHAH210006432020 | दाखल दिनांक | :– | २२.०७.२०२० |
| | नोंदणी दिनांक | :– | २२.०७.२०२० |
| | निकाल दिनांक | :– | ०६.०५.२०२६ |
| | कालावधी | :– | वर्ष महिने दिवस, |
| | | | ०५ ०९ १४ |

| | | |
|---|---|---|
| **<u>जामखेड येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्यायालय क्रमांक १),</u>**<br>**<u>ता. जामखेड, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात</u>**<br>(पिठासीन अधिकारी यु. ए. भोसले)<br>**(संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ११२/२०२०) निशाणी ३२** | | |
| गुन्हा नोंद क्रमांक ६३२/२०१९, जामखेड पोलिस ठाणे | | |
| फिर्यादी / तक्रारदार | | **महाराष्ट्र शासन,** मार्फत<br>जामखेड पोलीस ठाणे |
| अभियोग पक्षातर्फे | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता<br>श्री. डी. एल. नळवाडे |
| आरोपी | | **किसन बिभीषन दळवी**<br>वय वर्ष – ३२, व्यवसाय – मजुरी<br>रा. पाथरुड,<br>ता. भूम, जि. उस्मानाबाद. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | | ॲड. जे. एम. कोल्हे |

**<u>भाग–ब</u>**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | ०३.११.२०१९ |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | १०.११.२०१९ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | २२.०७.२०२० |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :– | २१.०६.२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :– | २४.०८.२०२२ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :– | –– |
| न्यायनिर्णय दिनांक | :– | ०६.०५.२०२६ |

| | | |
|---|---|---|
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :- | निरंक. |

## <u>आरोपीची माहिती</u>

| आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याची दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| किसन बिभीषन दळवी | नाही | १६.११. २०१९ | भारतीय दंड संहिता कलम २७९, ३३७, ३३८, ४२७, १७७ व मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## <u>न्या य नि र्ण य</u>

(दिनांक ०६.०५.२०२६ रोजी घोषित केले)

प्रस्तुत खटला आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता कलम २७९, ३३७, ३३८, ४२७, १७७ व मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे चालवण्यात आलेला आहे.

२. **अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात पुढील प्रमाणे –**

अ. अंकुश भानुदास घुले यांच्या तक्रारी जबाबानुसार दिनांक ०३.११.२०१९ रोजी दुपारी ०१.०० वाजताचे सुमारास तो व त्याचा पुतण्या ज्ञानदेव बंकट घुले असे राजुरी येथुन त्याची डिस्कव्हर गाडी क्रमांक एमएच–१६–एएन–२२९७ हिच्यावर बसून जामखेड येथे लग्नासाठी चालले होते. त्यावेळी तक्रारदार गाडी चालवत होता. त्यावेळी ते राजुरी गावातील न्यु इंग्लीश स्कुलच्या समोर आले असता समोरुन एक क्रुझर गाडी वेगाने आली व त्या गाडीने त्यांना जोराची धडक दिली. त्यामुळे ते दोघेजण गाडीसह रोडवर खाली पडले. त्यामुळे त्यांच्या डोक्याला, तोंडाला, हाताला, पोटाला व पायाला मार लागल्याने, ते बेशुध्द पडले होते. त्यानंतर ६ ते ७ दिवसांनी तक्रारदार शुध्दीवर आल्यावर त्याला समजले की तो ओम

हॉस्पीटल येथे ॲडमिट आहे. त्याचा डावा पाय मोडलेला असुन डोक्याला मार लागलेला आहे. ज्ञानदेव बंकट घुले याला देखील दोन्ही पायाला मार लागून डावा हात मोडलेला असून त्याच्या डोक्याला व तोंडाला मार लागलेला आहे. गावातील सिताराम घुले, भाऊसाहेब घुले, शहादेव घुले व इतर जमलेल्या लोकांनी त्यांना सरकारी ॲंब्युलंसमध्ये टाकुन ओम हॉस्पीटल, जामखेड येथे उपचार करण्यासाठी दाखल केले. तसेच त्यांना धडक देणारे क्रुझर गाडी एमएच–४५–एन–१७८२ या गाडीवरील चालक नामे किसन बिभीषन दळवी असे असल्याचे समजले. ज्ञानदेव हा जास्त आजारी असल्याने त्याला उपचारासाठी अहमदनगर येथे दवाखान्यात घेऊन गेले आहेत. तसेच त्याच्या मोटारसायकलचे देखील नुकसान झाले आहे.

३. सदर तक्रारी जबाबावरुन गुन्हा रजिस्टर क्रमांक ६३२/२०१९ नोंदविण्यात आला. अन्वेषण अधिकारी यांनी तपासादरम्यान साक्षीदारांचे जाब–जबाब नोंदविले आणि गुन्ह्याचा तपास केला. त्यांच्या तपासात पुरावा मिळुन आल्याने त्यांनी आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपी हजर झाल्यानंतर त्याच्याविरुध्द निशाणी ८ खाली भारतीय दंड संहिता कलम भारतीय दंड संहिता कलम २७९, ३३७, ३३८, ४२७, १७७ व मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे गुन्ह्याची प्रतिकथन नोंदवण्यात आले. त्याने गुन्हा नाकबूल करून खटला चालवण्याची विनंती केली.

५. अभियोगपक्षाने अभिलेखावर एकुण सहा साक्षीदार तपासले आहेत. आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) नुसारचे निवेदन निशाणी ८ लगत नोंदवले आहे.

६. युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत प्रकरणामध्ये आरोपीविरुध्द ठेवण्यात आलेले दोषारोप व अभियोगपक्षाने सादर केलेला पुरावा इत्यादींवरुन खालील मुद्दे माझे पुर्वपिठासिन अधिकारी यांचेसमक्ष उपस्थित झाले आहेत, ते मुद्दे आणि त्यावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविण्यात आले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, आरोपीने दिनांक ०३.११.२०१९ रोजी दुपारी ०१.०० वाजताचे सुमारास त्याचे ताब्यातील वाहन क्रमांक एम एच–४५–एन–१७८२ हे सार्वजनिक रस्त्यावरुन मानवी जिवीतास धोका निर्माण होईल अशा रितीने बेदरकारपणे व रस्त्याच्या परिस्थीतीकडे दुर्लक्ष करुन चालवले? | **नकारार्थी.** |
| **२.** | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, आरोपीने उपरोक्त ठिकाणी, दिवशी, वेळी व सदर वाहनाने तक्रारदार अंकुश व साक्षीदार ज्ञानदेव यांच्या वाहनाला धडक देऊन त्यांच्या किरकोळ दुखापतीस कारणीभूत ठरला? | **नकारार्थी.** |
| **३.** | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, आरोपीने उपरोक्त ठिकाणी, दिवशी, वेळी व सदर वाहनाने तक्रारदार अंकुश व साक्षीदार ज्ञानदेव यांच्या वाहनाला धडक देऊन त्यांच्या गंभीर दुखापतीस कारणीभूत ठरला? | **नकारार्थी.** |
| **४.** | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, आरोपीने उपरोक्त ठिकाणी, दिवशी, वेळी व सदर वाहनाने तक्रारदार अंकुश व साक्षीदार ज्ञानदेव यांच्या वाहनाला धडक देऊन त्यांच्या वाहनाच्या नुकसानीस कारणीभूत ठरला? | **नकारार्थी.** |
| **५.** | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, आरोपीने उपरोक्त ठिकाणी, दिवशी, वेळी व सदर वाहन रस्त्याच्या विरुध्द दिशेने व इतर व्यक्तिंना दुखापत किंवा त्यांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा पध्दतीने चालवले? | **नकारार्थी.** |

| | | |
|---|---|---|
| ६. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, आरोपीने उपरोक्त ठिकाणी, दिवशी, वेळी व उपरोक्त वाहन मानवी जिवीतास धोका निर्माण होईल अशा रितीने बेदरकारपणे व रस्त्याच्या परिस्थीतीकडे दुर्लक्ष करुन चालवले? | **नकारार्थी.** |
| ७. | आदेश काय? | **आरोपीस निर्दोष सोडण्यात येते.** |

## <u>का र ण मि मां सा</u>

### मुद्दा क्रमांक १ ते ६ करिता

७. अभियोगपक्षाने साक्षीदार क्रमांक १ अंकुश भानुदास घुले याला निशाणी ८ लगत तपासले असुन त्याने त्याच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, अंदाजे ३ वर्षापुर्वी राजुरी येथील हायस्कुल समोर दुपारी ०१.०० वाजताचे सुमारास तो व त्याचा चुलत भाऊ ज्ञानदेव घुले मोटारसायकलवरुन डोळेवाडीवरुन जामखेड येथे येत होते. त्यावेळी सदरची मोटारसायकल तो चालवत होता. ते राजुरी येथील हायस्कुलसमोर आल्यावर एका क्रुझर गाडीने त्यांना समोरुन धडक दिली. सदरच्या क्रुझर गाडीचा चालक किसन बिभीषन दळवी हा होता. अपघातामुळे त्याचा डावा पाय मोडला व त्याच्या डाव्या गालावर मार लागला. ज्ञानदेव याचा देखील सदरच्या अपघातामुळे पाय मोडला होता. अपघातानंतर तो बेशुध्द झाला होता. तेथील लोकांनी त्याला व ज्ञानदेवला ओम हॉस्पीटल, जामखेड येथे नेले. तेथील डॉक्टरांनी त्याला व ज्ञानदेव याला नगर येथील दवाखान्यात पाठवले. तेथे त्यांच्यावर औषधोपचार करण्यात आले. नगरच्या दवाखान्यात असताना पोलीस तेथे आले होते. तेथे पोलीसांनी त्याचा जबाब (निशाणी ११) व छापील प्रथम खबरी अहवाल (१२) नोंदवला होता.

८. सदर साक्षीदाराचा आरोपीच्या वतीने सविस्तर उलटतपास घेण्यात आला. त्यावेळी त्याच्या उलटतपासामध्ये त्याने असे मान्य केले आहे की, सदरचा जबाब अपघातानंतर १५ दिवसांनी नोंदवला होता. त्याने

पुढे असे कबूल केले की, मागच्या तारखेला त्याने आरोपीला पाहिले होते व त्यापुर्वी त्याने आरोपीला पाहिले नव्हते. मागच्या वेळी त्याने आरोपीला न्यायालयात पाहिल्याने आजरोजी त्याला तो ओळखतो. साक्षीदार पुढे कबूल करतो की, अपघाताच्या वेळी त्याने व ज्ञानदेव याने हेलमेट परिधान केले नव्हते, जामखेड ते तुळजापुर रस्ता हा महामार्ग असल्याने त्या रस्त्यावर नेहमी वाहनांची वर्दळ असते, अपघातानंतर त्याला सरकारी दवाखान्यात नेले नव्हते.

९. अभियोगपक्षाचा साक्षीदार क्रमांक २ शहादेव साधु घुले याने त्याच्या निशाणी ८ लगतच्या पुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, घटना अंदाजे ३ वर्षापुर्वी राजुरी येथील हायस्कुलसमोर दुपारी ०४.३० ते ०५.०० वाजता घडली होती. घटनेच्या वेळी तो त्याचे घरी होता. फोन आल्यामुळे तो व गावातील दहा ते बारा लोक घटनास्थळी गेले तेव्हा अंकुश व ज्ञानदेव तेथे नव्हते. त्यांना जामखेड येथील दवाखान्यात नेण्यात आले होते. घटनास्थळी त्याला गाड्या पडलेल्या दिसल्या नव्हत्या. घटनेबाबत पोलीसांनी त्याचा जबाब नोंदवला होता किंवा कसे हे त्याला आठवत नाही. तो जामखेड येथील दवाखान्यात गेला असता अंकुश व ज्ञानदेव हे जखमी अवस्थेत असलेले त्याला दिसले होते. अंकुशच्या दोन्ही पायाला जखमा झालेल्या होत्या व ज्ञानदेवच्या उजव्या हाताला मार लागला होता. दवाखान्यात पोलीसांनी त्याचा जबाब नोंदवला होता.

१०. सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य केले नाही त्यामुळे अभियोगपक्षातर्फे त्यांना उत्तरसुचक प्रश्न विचारले. त्यामध्ये त्याने असे मान्य केले आहे की, तो घटनास्थळी गेला असता तेथे एक क्रुझर गाडी क्रमांक एमएच–४५–१७८२ उभी होती व त्यामधील चालकाला त्यांनी गाडीतून खाली उतरुन त्याला त्याचे नाव गाव विचारले असता, त्याने त्याचे नाव किसन बिभीषन दळवी असल्याचे सांगितले होते. त्यानंतर त्याने व इतर लोकांनी अंकुश व ज्ञानदेव यांना जामखेड येथील ओम हॉस्पीटलमध्ये भरती केले होते. त्याने सांगितल्याप्रमाणे पोलीसांनी त्याचा जबाब नोंदवला होता.

११. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये त्याने असे मान्य व कबुल केले की, अपघाताबाबत त्याला व्यक्तीश: फोन आला नव्हता. तो घटनास्थळी गेला नाही. तो नेमका किती वाजता घटनास्थळी पोहोचला

हे त्याला आठवत नाही. त्याने असेही कबूल केले की, अपघातस्थळी त्याने क्रुझर चालकास नाव गाव विचारले नव्हते. अंकुशची मोटारसायकल जुनी आहे किंवा कसे हे तो सांगु शकत नाही. पोलीसांनी त्याचा जबाब नोंदवला नव्हता.

१२. अभियोगपक्षाचा साक्षीदार क्रमांक ३ प्रविण रावसाहेब शिंदे याने त्याच्या पुराव्यामध्ये दिनांक १०.११.२०१९ रोजी पोलीसांनी त्याला पंचनाम्याकामी बोलावले नसल्याचे कथन केले आहे. तसेच पोलीसांनी त्याच्यासमक्ष पंचनाम्याची कोणतीही कार्यवाही केली नव्हती. सदर साक्षीदाराने घटनास्थळ पंचनाम्यावरील सही (निशाणी १४) वगळता इतर सर्व मजकुर नाकारला. त्यामुळे अभियोगपक्षातर्फे त्याला उत्तरसुचक प्रश्न विचारण्यात आले. मात्र त्यांना पुरक अशा बाबी अभिलेखावर आल्या नाहीत.

१३. अभियोगपक्षाचा साक्षीदार क्रमांक ४ ज्ञानदेव बंकट घुले याने त्याच्या निशाणी ८ लगतच्या पुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, आरोपीचे नाव किसन बिभीषन दळवी असे आहे. त्याच्या गाडीने त्यांना धडक दिल्यामुळे तो त्याला ओळखतो. घटना दिनांक ०३.११.२०१९ रोजी दुपारी ०१.०० वाजता सुमारास न्यु इंग्लीश स्कुल राजुरी समोर घडली. घटनेच्यावेळी तो व त्याचे नातेवाईक राजुरीवरुन जामखेड येथे मोटारसायकलने येत होते. त्यावेळी समोरुन एक क्रुझर गाडी भरधाव वेगात त्यांच्याकडे आली व तीने त्यांना धडक दिली. सदरच्या धडकेमुळे तो व त्याच्यासोबत असलेला अंकुश घुले असे खाली पडले. त्यानंतर ते दोघेही बेशुध्द झाले. त्यानंतर काय घडले हे त्याला आठवत नाही.

१४. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये त्याने असे मान्य केले आहे की, पोलीसांनी त्याचा जबाब नेमका कोणत्या तारखेला नोंदवला हे तो सांगु शकत नाही. घटनास्थळाच्या बाजुला दोन मोठ–मोठे वळणे आहेत. घटनास्थळ हे तुळजापुर महामार्ग असल्याने वाहनांची व पायदळ चालणा–यांची सारखी वर्दळ असते. घटनेच्या वेळी त्याचे व अंकुशच्या डोक्यावर हेलमेट नव्हते. तो कबूल करतो की, तथाकथीत घटनेमधील मोटारसायकल ही अंकुशने दुस–या व्यक्तिकडून विकत घेतली होती.

१५. अभियोगपक्षाचा साक्षीदार क्रमांक ५ सिताराम तुकाराम खाडे याने त्याच्या निशाणी ८ लगतच्या पुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, घटना अंदाजे ०३.११.२०१९ रोजी दुपारी ११.०० ते १२.०० वाजताचे सुमारास राजुरी येथील न्यु इंग्लीश स्कुलसमोर घडली. त्यावेळी तो राजुरी येथील बस स्थानकावर थांबला होता. त्यावेळी त्यांना अचानक मोठा आवाज आल्याने तो घटनास्थळी गेला. त्यावेळी क्रुझर गाडी व मोटारसायकल यांचा अपघात झाल्याचे त्याला दिसले. त्यावेळी फिर्यादी व त्याच्या सोबत असलेला ज्ञानदेव घुले हे रस्त्यावर पडलेले त्याला दिसले. सदरच्या अपघातामुळे फिर्यादीच्या पायाला गंभीर दुखापत होऊन त्याचा पाय मोडला होता. तसेच फिर्यादीच्या जबड्याला गंभीर दुखापत झाल्याचे त्याला दिसुन आले. त्याचप्रमाणे ज्ञानदेव घुले याचा डावा हात मोडल्याचे त्याला दिसले. त्यानंतर इतर लोकांपैकी एकाने फिर्यादी व ज्ञानदेव यांना रुग्णवाहीकेतून ओम हॉस्पीटल जामखेड येथे भरती केले. ज्ञानदेव याला तेथील डॉक्टरांनी नगर येथे डॉक्टर अनभुले यांच्या दवाखान्यात पाठवले. घटनेबाबत पोलीसांनी त्याचा जबाब नोंदवला होता.

१६. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये त्याने असे मान्य केले आहे की, ज्ञानदेव घुले हा त्याचा नातेवाईक आहे. घटनेच्या दिवशी पोलीसांनी त्याचा जबाब नोंदवला होता. त्याने पोलीसांना जबाब देतेवेळी त्याचा पत्ता डोळेवाडी असल्याचे, फिर्यादीचा पाय मोडल्याचे ज्ञानदेवचा डावा हात मोडल्याचे सांगितले होते. मात्र पोलीसांनी सदरचा मजकुर त्याच्या जबाबामध्ये का नमुद केला नाही याचे कारण त्याला सांगता येणार नाही. यावरुन त्याने सदरचा मजकुर अतिरीक्त सांगितला असल्याचे दिसून येते. घटनेच्या वेळी नेमके किती लोक घटनास्थळी गोळा झाले होते हे तो सांगु शकत नाही. यावरुन तो घटनास्थळी हजर असल्याबाबत संशय निर्माण होतो. त्याने कबूल केले आहे की, राजुरी बसस्थानकापासुन न्यु इंग्लीश हायस्कुलच्या पुढे वळणाचा रस्ता आहे. तो रस्ता राष्ट्रीय महामार्ग असुन त्यावर नेहमी रहदारी असते. त्या रस्त्यावर शेतक-यांच्या जनावरांची वर्दळ असते. रुग्णवाहीकेला नेमका कोणी फोन केला हे त्याला माहिती नाही. घटनेच्यावेळी फिर्यादीने हेल्मेट परिधान केले होते किंवा कसे हे त्याला आठवत नाही. सदर साक्षीदार असे कबूल करतो की, घटना त्याने प्रत्यक्षात पाहिली नाही. यावरुन सदर साक्षीदाराच्या साक्षीविषयी संशय निर्माण होतो.

सदर साक्षीदार विश्वासार्ह असल्याचे दिसून येत नाही.

१७. अभियोगपक्षाचा साक्षीदार क्रमांक ६ अन्वेषण अधिकारी अजय कारभारी साठे याने त्याच्या निशाणी ८ लगतच्या पुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक १०.११.२०१९ तो पोलीस नाईक या पदावर कार्यरत असताना त्याच्याकडे गुन्हा रजिस्टर क्रमांक ६३२/२०१९ चा तपास लेखी आदेशान्वये (निशाणी २१) देण्यात आला. तपासादरम्यान त्याने सर्वप्रथम घटनास्थळी जाऊन दोन पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा (निशाणी २२) तयार केला. त्यानंतर त्याने साक्षीदारांचे जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदवले. साक्षीदार क्रमांक २ शहादेव घुले याचा जबाब (निशाणी २३) त्याच्या सांगण्याप्रमाणे नोंदवला होता. त्यानंतर त्याने वाहनांचे कागदपत्र हस्तगत केले. आरोपीस अटक केली. त्यानंतर त्याने जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. तपासाअंती आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने त्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

१८. सदर साक्षीदाराचा आरोपीतर्फे सविस्तर उलटतपास घेण्यात आला. त्यावेळी त्यांनी मान्य व कबूल केले की, जखमी अंकुश घुले याची गाडी जुनी होती व त्याच्याकडे गाडी चालवण्याचा परवाना नव्हता तसेच गाडीचा विमा देखील नव्हता. साक्षीदाराने कबूल केले की, अंकुशने त्याची गाडी चालवताना हेल्मेट परिधान केले नव्हते. तथाकथीत घटनेतील दोन्ही गाड्यांचा विस्तृत वर्णनाचा पंचनामा त्याने केला नाही. गाडीची तपासणी जामखेड येथील एका फिटरमार्फत करुन घेतली होती मात्र त्याचे नाव त्याला आठवत नाही. फिटरचा अहवाल त्याने दोषारोपपत्रासोबत दाखल केला नाही. ज्यावेळी त्याने घटनास्थळ पंचनामा केला त्यावेळी घटनास्थळी वाहन नव्हते. घटनास्थळी दोन ते चार वळणे आहेत. घटनास्थळी रस्त्याच्या दोन्ही कडेला साईड पट्टया आहेत. घटनास्थळ हे वर्दळीचे ठिकाण असून तेथे अनेक वाहनांची वर्दळ असते. घटनास्थळाजवळ श्री.स्वामी समर्थ यांचे मंदिर, बाळासाहेब लटपटे यांचे घर व एक हायस्कुल आहे. त्यामुळे घटनास्थळी अनेक लोकांची वर्दळ असते. त्याने तेथील लोकांचे जबाब नोंदवले नाहीत. घटनास्थळापासून राजुरी बसस्थानक अंदाजे अर्धा किलोमिटर अंतरावर आहे. त्याच्यामध्ये अनेक घरे आहेत. साक्षीदार पुढे मान्य करतो की, घटनास्थळापासुन बस स्थानकापर्यंत कोणताही आवाज

जात नाही.

१९. सदर साक्षीदार हा घटनेचा अन्वेषण अधिकारी आहे. अशा परिस्थितीत त्याने दिलेल्या कबुली जबाबावरुन त्याने सदर गुन्ह्याचा योग्य तपास केला असल्याबाबत संशय निर्माण होतो. त्यांच्या त्रुटीयुक्त तपासामुळे त्याची साक्ष आरोपींवरील दोषारोप सिध्द करणेस पुरक ठरत नाही.

२०. फौजदारी विधी तत्वानुसार संशयाच्या पलिकडे जाऊन गुन्हा सिद्ध करण्याची पुर्णपणे जबाबदारी अभियोगपक्षाची असते. अभिलेखावर आलेल्या पुराव्यावरुन व वर चर्चा केलेल्या कारणांवरुन हे स्पष्टपणे दिसून येते की, भारतीय दंड विधान कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ तसेच मोटार वाहन कायदा कलम १७७ व १८४ नुसार आरोपीने सदरचा अपराध केला असल्याची बाब अभियोगपक्षाने संशयाच्या पलीकडे जाऊन सिध्द केली नाही. प्रस्तुतचा गुन्हा सिद्ध करण्यासाठी आवश्यक असणारे घटक अभियोगपक्षाने संशयाच्या पलिकडे जाऊन सिद्ध केलेले नाहीत. सदरची घटना ही दिनांक ०३.११.२०१९ रोजी घडली आणि तक्रार ही दिनांक १०.११.२०१९ रोजी दाखल केली. वरीत ७ दिवसांच्या विलंबाचे संयुक्तिक कारण अभिलेखावर नाही. त्यामुळे सदर अपराधासाठी दोषी ठरवता येणार नाही. आरोपीस संशयाचा फायदा देण्यात येतो. त्यामुळे मी **विचाराधीन प्रश्न क्रमांक १ ते ६ चे उत्तर नकारार्थी** असे देते.

**मुद्दा क्रमांक ७ करिता**

२१. मुद्दे क्रमांक १ ते ६ ची कारणमिमांसा आणि त्यावर आलेले निष्कर्ष पाहता आरोपीवर ठेवण्यात आलेल्या आरोपांतुन तो निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतो. सबब, मुद्दा क्रमांक ७ करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे.

| **आदेश** | |
|---|---|
| **१.** | आरोपी **किसन बिभीषन दळवी** याला भारतीय दंड विधान कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ तसेच मोटार वाहन कायदा कलम १७७ व १८४ नुसार गुन्हा केल्याच्या आरोपातुन फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५(१) अन्वये निर्दोषमुक्त करण्यात येते. |

| | |
|---|---|
| **२.** | आरोपीने यापुर्वी दिलेले वैयक्तिक जात मुचलका व रोख रकमेचे बंधपत्र रद्द करण्यात येत आहेत. |
| **३.** | आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ नुसार रुपये १५०००/– चा वैयक्तिक जात मुचलका व बंधपत्र द्यावेत. सदरचे वैयक्तिक जातमुचलका व बंधपत्र हे पुढील सहा महिन्याच्या कालावधीपर्यंत वैध राहतील. त्यानंतर ते आपोआप रद्द झाल्याचे समजण्यात येईल. |
| | (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला) |

Digitally signed by UMA KAKASAHEB GANGANE
Date: 2026.05.06 17:51:11 +0530

**( यु. ए. भोसले )**
दिनांक– ०६.०५.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
ठिकाण – जामखेड. **जामखेड**

## भाग–क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोगपक्ष साक्षीदार**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | अंकुश भानुदास घुले | तक्रारदार | ८ लगत |
| २. | शहादेव साधु घुले | साक्षीदार | ८ लगत |
| ३. | प्रविण रावसाहेब शिंदे | घटनास्थळ पंचनामा | ८ लगत |
| ४. | ज्ञानदेव बंकट घुले | साक्षीदार | ८ लगत |
| ५. | सिताराम तुकाराम खाडे | साक्षीदार | ८ लगत |
| ६. | अजय कारभारी साठे | अन्वेषण अधिकारी | ८ लगत |

**ब. बचावपक्ष साक्षीदार, जर असेल तर–**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | -- | -- | -- |

**क. न्यायालयीन साक्षीदार, जर असेल तरः**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | -- | -- | -- |

**सरकारपक्ष/बचावपक्ष/न्यायालय यांनी दिलेल्या निशाण्या**

**अ. सरकारपक्ष**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | ११ | तक्रार |

| | | |
|---|---|---|
| २. | १२ | प्रथम खबरी अहवाल |
| ३. | १४ | घटनास्थळ पंचनामा |
| ४. | २१ | तपास आदेश |
| ५. | २२ | घटनास्थळ पंचनामा |
| ६. | २३ | साक्षीदार क्रमांक २ या फौज.प्र.सं कलम १६१ प्रमाणेचा जबाब |

**ब. बचावपक्ष**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | -- | -- |

**क. न्यायालयीन निशाणी**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | ०८ लगत | आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) प्रमाणेचा जबाब |

**ड. मुद्देमालाचे वर्णन**

| **अ.क्र.** | **आर्टिकल** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | -- | -- |

Digitally signed by UMA KAKASAHEB GANGANE
Date: 2026.05.06 17:51:16 +0530

**( यु. ए. भोसले )**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
**जामखेड**

दिनांक– ०६.०५.२०२६
ठिकाण – जामखेड